शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जालना महानगरपालिकेचे महापौरपद अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव

## चार महिला, एक ऐतिहासिक संधी

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या पहिल्या महापौरपदासाठी अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर शहराच्या राजकारणात नवा अध्याय सुरू झाला आहे. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतरचा पहिलाच महापौर ठरण्याचा ऐतिहासिक मान कोणाला मिळणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, या पदावर सुशिक्षित, सक्षम व प्रशासकीय जाण असलेली महिला विराजमान व्हावी, अशी जोरदार चर्चा आणि अपेक्षा व्यक्त होत आहे.

नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ६५ पैकी ४१ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. त्यामुळे महापौरपद भाजपकडे जाणे निश्चित मानले जात आहे. मात्र अनुसूचित जाती (महिला) आरक्षणामुळे अनेक दिग्गज नेत्यांच्या कुटुंबीयांची महत्त्वाकांक्षा अपूर्ण राहिली आहे. रावसाहेब दानवे यांचे बंधू भास्कर दानवे, त्यांच्या पत्नी सुशिला दानवे, तसेच माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचे कुटुंबीय निवडणूक रिंगणात असले तरी आरक्षणामुळे त्यांची नावे या शर्यतीतून बाहेर पडली आहेत.

भाजपकडून अनुसूचित जाती प्रवर्गातून चार महिला नगरसेविका निवडून आल्या आहेत. यात ॲड. रिमा संदीप खरात (प्रभाग क्र. १४), श्रद्धा दीपक साळवे (प्रभाग क्र. २), रुपा संजय कुरील (प्रभाग क्र. ४) आणि वंदना अरुण मगरे (प्रभाग क्र. १५) यांचा समावेश आहे.

या चौघींपैकीच एका नावावर पक्षश्रेष्ठी अंतिम शिक्कामोर्तब करणार आहेत.

**सुशिक्षित चेहऱ्याला पसंतीची चर्चा**

महानगरपालिका नव्याने






अस्तित्वात येत असल्याने प्रशासन उभे करणे, मूलभूत सुविधा विकसित करणे, शहराचा आराखडा, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य व शिक्षण व्यवस्था सक्षम करणे ही मोठी आव्हाने पहिल्या महापौरासमोर असणार आहेत. त्यामुळे कायद्याचे ज्ञान, प्रशासकीय समज, अभ्यासू नेतृत्व आणि संवादकौशल्य असलेली सुशिक्षित महिला महापौरपदी यावी, अशी भूमिका भाजपच्या गोटात तसेच सुजाण नागरिकांतून पुढे येत आहे.

याच पार्श्वभूमीवर ॲड. रिमा खरात यांचे नाव विशेष चर्चेत असून, त्यांचे शैक्षणिक पार्श्वभूमी, कायदेविषयक ज्ञान आणि सामाजिक प्रश्नांवरील स्पष्ट भूमिका याकडे लक्ष वेधले जात आहे. तथापि, इतर उमेदवारांची पक्षनिष्ठा, संघटनात्मक कामगिरी आणि स्थानिक राजकीय पकड यांचाही विचार केला जाणार असल्याचे संकेत आहेत.

**महिला नेतृत्वाचा नवा अध्याय**

जालना महानगरपालिकेचा पहिला महापौर म्हणून महिला विराजमान होणे ही केवळ राजकीय बाब नसून, सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. महिलांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळणे, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देणे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

आगामी दोन-चार दिवसांत भाजपकडून अधिकृत घोषणा होणार असून, त्यानंतर जालना शहराला पहिला महापौर मिळेल. मात्र हा ऐतिहासिक बहुमान सुशिक्षित, सक्षम आणि दूरदृष्टी असलेल्या महिलेलाच द्यावा, अशीच अपेक्षा सध्या शहरभर व्यक्त होत आहे.

## ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमानिमित्त २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड शहरात वाहतूक नियमन

**जालना । प्रतिनिधी -** ‘‘हिंद-दी-चादर’’ या कार्यक्रमानिमित्त दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात देशातील व राज्यातील अनेक अतिमहत्वाचे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश आहे. हे सर्व मान्यवर नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास देश-विदेशातून मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल होणार असल्याने नांदेड शहरात वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील शांतता, सुव्यवस्था व वाहतुकीचे सुरळीत नियोजन राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतूक नियमनाबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे.

या कालावधीत व्हीव्हीआयपी दौऱ्यादरम्यान तात्पुरत्या स्वरूपात आसना ब्रिजशंकरराव चव्हाण चौकगुरुद्वारा मालटेकडी रोडमालटेकडी ओव्हरब्रिज, नमस्कार चौक ते नाईक चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा, हिंगोली गेट ओव्हरब्रिज, चिखलवाडी चौक, आय.टी.आय. ते अण्णाभाऊ साठे पुतळा, अण्णाभाऊ साठे पुतळा ते नाईक चौक (आनंदनगरकडे), हिंगोली गेट अंडरब्रिज ते अण्णाभाऊ साठे पुतळा, चिखलवाडी ते हिंगोली गेट ओव्हर/अंडरब्रिज, चिखलवाडी ते गुरुद्वारा हनुमान मंदिरभगतसिंग चौक, बर्की चौक ते जुना मोंढा मार्गे वजिराबाद, कविता हॉटेल ते जुना मोंढा कौठा, एम.जी. हेक्टर शोरूम ते साई कमान कौठा, भगतसिंग चौक ते श्रीराम चौक (पूर्व बाजू), अहिल्यादेवी होळकर चौकमामा चौक, बी.डी.डी.एस. ऑफिस ते मामा चौकश्रीराम चौक, लिंबगाव ते वाघी रोडहसापूर मार्ग (कार्यक्रमास येणारी वाहने वगळून), रविनगर ते नागार्जुन शाळा तसेच कौठा चौकी ते रविनगर, बसवेश्वर पुतळा ते अहिल्याबाई होळकर चौकपदमजासिटीभगतसिंग चौक हे मार्ग वाहतुकीस बंद राहणार आहेत.

वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग म्हणून चिखलवाडीअण्णाभाऊ साठे पुतळानाईक चौककडे जाणारी **पान २ वर**

## पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाट्न

**परतूर । प्रतिनिधी -** शाळेच्या व्यासपीठावर स्वतःमधील कलागुण सादर करण्याची संधी मिळाल्याने अनेक कलावंत घडले आहेत.त्यामुळे शाळेच्या व्यासपीठाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी केले.

शहरातील छत्रपती शिवाजीनगरमधील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाट्न भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उदघाटक म्हणून ते बोलत होते.शाळेचे मुख्याध्यापक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य तथा विचारवंत रंगनाथ खेडेकर,केंद्रप्रमुख बाबासाहेब तरवटे,अंकुश शिंदे,द्रौपदाबाई आकात इंग्लिश स्कुलच्या मुख्याध्यापिका शिलजा के. सोमन यांची उपस्थिती होती.

भागवत पुढे म्हणाले की, शाळेमधून दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.या कार्यक्रमांमधूनच भविष्यातील कलावंत घडत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सर्व स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.




प्रा.खेडेकर म्हणाले की, मुलांनी अभ्यासासोबतच क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणे आवश्यक आहे.याच व्यासपीठावरून अनेक राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू आणि कलाकार निर्माण झाले आहेत.मुलांनी कुठल्याही परिस्थितीत निराश न होता सातत्याने प्रयत्न करावेत.यावेळी त्यांनी अनेक कविता, शेर म्हणून दाखवले. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.ज्या गोष्टीत आवड आहे त्यात करिअर घडवा असेही खेडेकर म्हणाले.

मुख्याध्यापक यांनी प्रास्ताविक करताना शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

भगवानसिंह परिहार,लक्ष्मण आर्दड, संदीप यादव यांच्यासह विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्पर्श’ कुष्ठरोग जनजागृती अभियान यशस्वी राबवा - श्रीमती आशिमा मित्तल

### कुष्ठरुग्णांना सन्मानने वागणुक देण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत सुक्ष्म नियोजन करुन प्रभावीपणे राबविण्यांच्या स्पष्ट सुचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाती आयोजित जिल्हा समन्वय समिती बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी डॉ. राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ.जी.डी.म्हस्के सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.जी.एम. कुडलीकर जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ.रघुवीर चंदेल माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.अतुल राजे आरोग्य वैद्यकिय अधिकारी मनपा जालना, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक, अधिकारी वर्ग व सहाय्यक संचालक कुष्ठरोग कार्यालय येथील कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती मित्तल म्हणाल्या की, या अभियान अंतर्गत दि. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणानंतर शासकीय कार्यालय व सरपंच यांनी ग्रामसभा घेऊन कुष्ठरोगाबाबत मार्गदर्शन करुन प्रतिज्ञा घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच ‘भेदभाव समाप्त करु या, सन्मानाची वागणुक देऊ या’ या घोषवाक्याची अमंलबजावणी करण्याचे आवाहन केले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुष्ठरोग निवारण दिन व पंधरवाडा साजरा करतांना शाळा/महाविद्यालयामध्ये कुष्ठरोगाच्या प्रतिज्ञाचे वाचन करुन कुष्ठरोग विषयी औषधोपचार व आजाराबाबत गैरसमज माहिती द्यावी.

आरोग्य सेवा कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ.सुधाकर शेळके यांनी दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) अंतर्गत विट भट्टी, आश्रमशाळा, बांधकाम मजुर, कंपनीतील कामगार, कारागृहातील कैदी, झोपडपट्टी, स्थलांतरीत झालेला भागाचा प्रमुख्याने लक्ष केंद्रीत करुन सर्व्हेक्षण करण्यांत येणार असल्याचे सांगितले. तसेच सर्व्हे टीममध्ये एक आशा व एक पुरुष कर्मचारी किंवा स्वयंसेवक असणार आहे. तसेच कुष्ठरुग्णांच्या संपर्कातील नातेवाईकांना (सहवासिंतांना) रिफॅम्पिसीन या गोळीचा एक डोस देऊन संसर्गापासुन सुरक्षित करण्यांत येणार आहे. तसेच जालना यांनी कुष्ठरोगाची जालना जिल्हयातील कुष्ठरोगाची सद्यस्थिती व कुष्ठरोगाबाबत सविस्तर माहिती दिली.

## शाळेची गुणवत्ता आणि परिसर स्वच्छता पाहून मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभावित

**दहिफळ भोंगाने । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दहिफळ भोंगाने (पश्चिम) येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनू (मॅडम) यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि परिसरातील स्वच्छता पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

पारंपारिक पद्धतीने जंगी स्वागत

श्रीमती मिनू मॅडम यांचे आगमन होताच शाळेतील लहान मुलांच्या लेझीम पथकाने तालावर त्यांचे स्वागत केले. गावातील महिलांनी त्यांचे औक्षण केले, तर ग्रामस्थांच्या वतीने तुकाराम गाथा आणि पुष्पहार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

शालेय उपक्रम आणि भौतिक सुविधांची पाहणी पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी शाळेत राबवले जाणारे विविध उपक्रम आणि उपलब्ध भौतिक साधनांची माहिती अतिशय आत्मविश्वासाने दिली. मॅडमनी स्वतः सर्व वर्गखोल्या, कार्यालय, किचन शेड, गांडूळ खत प्रकल्प, स्वच्छतागृह, शैक्षणिक साहित्य कक्ष आणि परसबागेची बारकाईने पाहणी केली.

महत्त्वाची वैशिष्ट्ये: थेट संवादः मॅडमनी



वर्गात जाऊन इतर कोणालाही सोबत न घेता विद्यार्थ्यांशी गप्पा मारल्या.

गुणवत्ता चाचणीः आय.सी.टी. रूम, प्रयोगशाळा आणि वाचनालयातील साधनांबाबत मुलांशी प्रश्नोत्तरे करून त्यांच्या ज्ञानाची खातरजमा केली.

पोषण आहारः शालेय पोषण आहारात मिळणाऱ्या पदार्थांबाबत मुलांशी चर्चा केली. मार्गदर्शनः ऐतिहासिक वस्तूंचा जास्तीत जास्त संग्रह करून तो मुलांना अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी शिक्षकांना केल्या.

नवोदय पात्र विद्यार्थिनीचा गौरव

नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत पात्र ठरलेली विद्यार्थिनी कुमारी सविता शिवाजी दरफडे हिचा श्रीमती मिनू मॅडम यांनी स्वतः सत्कार करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महिलांना स्वावलंबनाचा संदेश

गावातील महिलांशी संवाद साधताना त्यांनी बचत गटांच्या माध्यमातून स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. ‘‘बचत गट स्थापन करा, मी दोन महिन्यांनी पुन्हा येऊन तुमच्या कामाची पाहणी करेन,‘‘ असे त्यांनी आश्वासित केले. तसेच पालकांना मुलांच्या सकस आहाराकडे लक्ष देण्यास सांगितले.

प्रशासकीय उपस्थिती

गटशिक्षणाधिकारी डॉ. भारत वानखेडे यांनी शाळेतील नवोदय, स्कॉलरशिप आणि मंथन परीक्षांच्या तयारीबद्दल माहिती दिली. दरवर्षी २-३ मुले नवोदयला पात्र ठरतात आणि मुलांकडून २५० प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जातात, हे ऐकून मॅडमनी कौतुक केले. याप्रसंगी गटविकास अधिकारी राजेश तांगडे, केंद्रप्रमुख शंकरराव थोटे, संजय खरात, सुरनर सर, मुंडे सर, संपत आढे सर, तसेच गावचे सरपंच, ग्रामसेवक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे प्रदीप बिल्होरे पाटील यांना मानाचे निमंत्रण

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी-** छत्रपती संभाजीनगर येथे दि. २६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत ७० वर्षांनंतर प्रथमच आयोजित होत असलेल्या ऐतिहासिक जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे प्रतिष्ठित निमंत्रण सामाजिक कार्यकर्ते तथा संभाजी ब्रिगेडचे संस्थापक प्रदीप बिल्होरे पाटील यांना प्रदान करण्यात आले आहे.

निमंत्रण प्रदान सोहळा

पूज्य प्रा. धम्म देशना महाथेरी व पूज्य संघशीला थेरी यांच्या हस्ते हे मानाचे निमंत्रण प्रदीप बिल्होरे पाटील यांना देण्यात आले. सामाजिक चळवळीतील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन देण्यात आलेले हे निमंत्रण त्यांनी सहर्ष स्वीकारले आहे.

२५ वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय

प्रदीप बिल्होरे पाटील हे गेल्या २५ वर्षांपासून सामाजिक चळवळीत सक्रिय आहेत. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक आंदोलनांमध्ये त्यांचा **पान २ वर**



# संपादकीय पान

## लोकशाहीचा सन्मान की पराभूतांचे पुनर्वसन?

महानगरपालिकेच्या निवडणुकीचा धुरळा खाली बसला असला, तरी सत्तेच्या राजकारणाची धूळ अद्याप हवेतच आहे. आता चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे तो स्वीकृत सदस्यांची निवड. ही प्रक्रिया कायद्याने मान्य असली, तरी तिचा वापर लोकशाही बळकट करण्यासाठी होणार की पराभूतांचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी, हा खरा प्रश्न आहे. महानगरपालिका सभागृह हे जनतेच्या इच्छेचे प्रतिबिंब असते. मतदारांनी मतदानातून ज्या उमेदवारांना स्पष्ट नकार दिला, त्याच व्यक्तींना मागच्या दाराने पुन्हा सभागृहात आणण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो मतदारांच्या कौलाचा अवमान ठरतो. स्वीकृत सदस्य ही संकल्पना 'पराभवाची भरपाई' करण्यासाठी नव्हे, तर तज्ज्ञतेची कमतरता भरून काढण्यासाठी अस्तित्वात आली आहे, हे राजकीय पक्षांनी विसरू नये.

**कायद्याचा हेतू आणि वास्तवातील खेळी**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाने स्वीकृत सदस्यांची तरतूद करताना स्पष्ट भूमिका मांडली आहे. निवडणुकीच्या राजकारणात न पडणारे, पण शहराच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकणारे डॉक्टर, वकील, अभियंते, शिक्षणतज्ज्ञ, सनदी लेखापाल, सामाजिक कार्यकर्ते यांना सभागृहात स्थान मिळावे, हा त्यामागचा मूळ उद्देश आहे. मात्र प्रत्यक्षात ही तरतूद अनेकदा पराभूत नेत्यांसाठीची 'राजकीय सेफ्टी व्हॉल्व्ह' बनताना दिसते, हे दुर्दैवी वास्तव आहे.

**जालन्याची गरज : चेहरे नव्हे, विचार**

जालना महानगरपालिका नव्याने स्थापन झाली आहे. शहराच्या भवितव्याचे आराखडे, मूलभूत सुविधा, आरोग्य यंत्रणा, शिक्षण व्यवस्था, कायदेशीर चौकट आणि नियोजनबद्ध विकास यासाठी अभ्यासू, प्रामाणिक आणि निर्भीड विचारांची गरज आहे.

पराभूत नेते पुन्हा सभागृहात गेले, तर निर्णय प्रक्रियेत नवे विचार येणार का, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

**तज्ज्ञ का हवेत?**

डॉक्टर सार्वजनिक आरोग्य, कचरा व्यवस्थापन व साथीच्या आजारांवर मार्गदर्शन करू शकतात.

वकील कायदेशीर वाद, ठरावांची शुद्धता आणि नियमावली तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

शिक्षणतज्ज्ञ महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी दिशा देऊ शकतात.

पत्रकार जनतेचा आवाज, प्रशासनातील त्रुटी आणि वास्तव सभागृहापर्यंत पोहोचवू शकतात.

**नैतिकतेची कसोटी**

स्वीकृत सदस्यांच्या निवडीद्वारे संख्याबळ वाढवणे हे राजकारण असू शकते; पण लोकशाहीत नैतिकतेलाही तितकेच महत्त्व असते. जनतेने नाकारलेल्या चेहऱ्यांना पुन्हा संधी देणे म्हणजे ''मतदानाचा अर्थ काय?'' असा प्रश्न नागरिकांच्या मनात उभा राहतो.

आज राजकीय पक्षांसमोर दोनच पर्याय आहेत

एक, कार्यकर्त्यांच्या आणि पराभूत नेत्यांच्या दबावाखाली जाऊन स्वीकृत सदस्यत्वाचा गैरवापर करणे.

दुसरा, जालन्याच्या दीर्घकालीन विकासाचा विचार करून तज्ज्ञ, अभ्यासू आणि निःपक्ष व्यक्तींना संधी देणे.

जालना महानगरपालिकेचा हा पहिलाच कारभार आहे. त्यामुळे घेतला जाणारा निर्णय परंपरा घडवणारा ठरणार आहे. आता प्रश्न इतकाच आहे की, स्वीकृत सदस्य ही संधी शहराच्या प्रगतीसाठी वापरली जाणार की राजकीय पुनर्वसनासाठी? याचे उत्तर लवकरच मिळेल, पण जनतेची अपेक्षा मात्र स्पष्ट आहे.

# स्वीकृत नगरसेवक पद राजकीय पातळीवर देण्यापेक्षा; सामाजिक पातळीवर दिले तर राज्याचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल

राज्यात व जिल्ह्यात महानगरपालिका निवडणुका झाल्यात आणि त्यातुनच ''नगरची'' सेवा करण्यासाठी ''नगरसेवकांची'' नियुक्ती झाली आहे.या नगरसेवकांना जनतेचा कौल मिळाला त्यामुळे हे नगरसेवक जनप्रतिनिधींची भूमिका निभविणार आहेत.या व्यतीरीक्त प्रत्येक महानगरपालिकेमध्ये अंदाजे १५ नगरसेवकांमागे १ स्वीकृत नगरसेवक अशा पध्दतीचे त्या-त्या महानगरपालिकेमध्ये अंदाजे १० किंवा कमी-जास्त स्वीकृत नगरसेवकसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. कोणाला स्वीकृत नगरसेवक करायचे हा अधिकार प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना असतोच यात दुमत नाही. परंतु राजकीय पक्षांसोबत जर सामाजिक कार्यातील व्यक्ती जुळली तर विकास भरभराटीला येईल.शहराच्या विकासाला खरोखरच गती यावी असे जर सरकारला वाटत असेल तर मग सामाजिक कार्यातील पत्रकार, लेखक, पर्यावरणवादी, अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्वीकृत सदस्य म्हणून का घेऊ नये?जिथे विकास हे ध्येय आहे.तिथे त्याग हा असलाच पाहिजे व त्यागाची भावना राजकीय पक्षांनी ठेवली पाहिजे.याकरीता थोडे राजकारण बाजूला सारून सामाजिक कार्याला सुध्दा प्राधान्य दिले पाहिजे. त्याचप्रमाणे संपूर्ण राजकीय पक्ष आपापल्या पक्षांचे उमेदवार निवडून यावे यासाठी प्रयत्नशील असतात आणि असायलाच हवे.परंतु प्रत्येक महानगरपालिकेच्या अंतर्गत सामाजिक कार्यशैलीला कुठेतरी मानाचे स्थान असने गरजेचे आहे. सामाजिक कार्य करणारे निष्ठावंत,विचारवंत व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, स्वतंत्र पत्रकार, विचारवंत,पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, निसर्ग प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्या व गल्ली पासून तर दिल्ली पर्यंत व दिल्ली पासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत लेखणीच्या माध्यमातून असो अथवा आपापल्या कार्यक्षेत्राच्या माध्यमातून असो अशांचा मानसन्मान कुठेतरी व्हायला हवा व त्यांच्या कार्याची पावती त्यांना कुठेतरी पुरस्कार रूपात मिळायला हवी म्हणून स्वीकृत नगरसेवकांच्या रूपात त्यांना मानाचे स्थान मिळायला हवे असे मला वाटते. कारण राजकारणाच्या ठिकाणी राजकारण ठीक आहे.परंतु सामाजिक कार्याला एक नवी चालना देण्याच्या उद्देशाने सरकारने व प्रशासनाने पाऊल उचलले पाहिजे.कारण स्वीकृत सदस्य हा पर्याय सरकार जवळ असल्याने याला राजकारणात गूरफटने योग्य नाही. यावर सरकारने, सन्माननीय राज्यपाल, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करून सामाजिक कार्याला नवीन दिशा देवून विकासाला वेग देण्यासाठी एक नवीन पाऊल उचलने गरजेचे आहे.आज पत्रकार, लेखक आपल्या लेखणीच्या माध्यमातून गल्लीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतची माहिती प्रत्येकांच्या घरोघरी पोहचविण्याचे कार्य करीत असतो. अशांना सरकारने स्वीकृत नगरसेवकांची जबाबदारी दिली तर सामाजिक कार्याला मोठी मदत होईल. राजकीय पुढारी हा आपल्या पद्धतीने कार्य करेलच यात दुमत नाही.परंतु सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक हे आपले कार्य आगळ्यावेगळ्या पद्धतीने करून एक नवीन विकासाचे पाऊल उभे करू शकते व नवीन ऊर्जा निर्माण करू शकते. कारण सामाजिक कार्याची जाणीव व दांडगा अनुभव यांना पुर्वीपासूनच असतो फक्त साथ हवी सरकारची व राजकीय पक्षांची.त्यामुळे सरकारने राजकीय ताळमेळासोबत सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्यांना जर सरकारने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली तर शहराच्या विकासामध्ये मोठी भर पडेल व मदत होईल. सरकारला माझी विनंती आहे की स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा. कारण अत्याधुनिक युगात शहर, राज्य, देश सध्याच्या परिस्थितीत विकासाचा महामेरू उभा करीत आहे यात स्वीकृत नगरसेवकसेवकांच्या माध्यमातून महानगरपालिकेमध्ये सामाजिक कार्याची भर पडली तर अवश्य त्याचे सोन होईल.कारण राज्यातील महापालिकांमध्ये जर सामाजिक कार्यातील व्यक्ती सहभागी झाली तर राज्यातील चित्र आगळेवेगळे दिसून येईल.कारण यामध्ये येणारे स्वीकृत नगरसेवक वेगवेगळ्या क्षेत्रातील असल्याने वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून मनपामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याचे काम करतील.कारण त्यांचा दांडगा अनुभव व अभ्यास शहराच्या विकासासाठी हातभार अवश्य लावेल. स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती सामाजिक पातळीवर केली तर राज्याचे नाव देशामध्ये सुवर्ण अक्षरात कोरले जाईल.यासाठी सर्वच राजकीय पक्ष व सरकारने एकमत करून ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून सामाजिक कार्याला नवीन चालना मिळेल.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# गर्दीत माणसांच्या माणसे शोधताना!

हल्ली पृथ्वीतलावर जिकडे जावे तिकडे माणसेच माणसे पाहायला मिळतात. पृथ्वीतलावर माणसांची तोबा गर्दीच गर्दी आपल्याला पाहायला मिळत आहे. माणसांच्या गर्दीत माणसे मात्र सापडतात पण खरी माणसे शोधायला गेल्यावर फार कमी प्रमाणात सापडतात. दिवसेंदिवस माणसांची संख्या कमी होऊन मानव रूपातील सैतानांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत चालली आहे. माणसासारखा व्यवहार करणारी व माणुसकीला जीवापाड जपणारी माणसे आता दुर्मिळ झाली आहेत. पृथ्वीतलावर नुसता माणसांचा वावर दिसत आहे, परंतु मानव रूपातील खऱ्या माणसांचा सुळसुळाट मात्र फार कमी झालेला दिसत आहे. पृथ्वीतलावर कपटी, स्वार्थी, ढोंगी, लबाड आणि धुर्त माणसांचा सुळसुळाट वाढल्यामुळे खरी माणसे कमी होऊन वाईट माणसांचा सुळसुळाट वाढला आहे.

देशात व्याभिचार, बलात्कार, अत्याचार व अनाचार मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे देशात खऱ्या माणसांची संख्या कमी होऊन मानव रूपातील दुष्ट हैवानांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत चालली आहे. माणसांच्या गर्दीत माणसे शोधताना माणसे कमी आणि मानव रूपातील राक्षस जास्त प्रमाणात पाहायला मिळत आहेत. माणसांच्या गर्दीत माणसे शोधताना माणसे न सापडता बलात्कारी, व्याभिचारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी आणि अनाचारी माणसे अधिक पाहायला मिळतात. देशात अमानुष्यतेने कळस गाठला आहे. माणूस माणसांसोबत माणसासारखा व्यवहार करत नाही तर रानटी पशुप्रमाणे व्यवहार करून माणुसकीला कलंक लावत आहे. देशात बलात्काराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. लहान निरागस चिमुकली पासून ते वयोवृद्ध आजीपर्यंत बलात्कार करून नराधम माणुसकीला काळीमा फासत आहेत. सकाळी वर्तमानपत्र उघडल्यास फ्रंट पानावर आपल्याला कुठे ना कुठेतरी बलात्कार झाल्याच्या बातम्या वाचायला मिळतातच. म्हणजे दररोज वर्तमानपत्रांत बलात्कार झाल्याच्या घटना वर्तमानपत्रात छापून येतात. महिलांनी, स्त्रियांनी व मुलींनी कामानिमित्त बाहेर फिरायचे का नाही? कोणत्या ना कोणत्या कामानिमित्त जर महिला घराबाहेर पडल्या तर दुष्ट नराधम वासनेच्या भरात नको ते करते करून माणुसकीला डागाळत आहेत. म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळून खूप वर्षे लोटली आहेत, तरीसुद्धा महिला व भगिनी देशात अजूनही सुखी व सुरक्षित नाहीत. एखाद्या मुलीवर अत्याचार वा बलात्कार होत असताना माणसांची गर्दीच गर्दी पाहायला मिळते. परंतु त्या गर्दीमध्ये कोणत्याच माणसातील मानवता जागी होऊन त्या पीडित महिलेच्या मदतीला कोणीच धावून येत नाही. सगळी माणसे बघ्याची भूमिका घेतात. काही माणसे व्हिडिओ शूटिंग करतात तर काही माणसे फोटो काढून घेतात आणि तात्काळ सोशल मीडियावर व्हायरल करतात. परंतु कोणाच माणूस माणुसकीच्या नात्याने त्या पिढीत महिलेला मदत करताना दिसत नाही. ही देशाची शोकांतिका म्हणावी लागेल. रस्त्यावर एखादी दुर्घटना घडली आणि त्या दुर्घटनेत समोरासमोर गाडीची टक्कर होऊन अनेक माणसे जखमी झाली, तर त्या अपघातात जखमी झालेल्या माणसांना रुग्णवाहिका बोलावून त्या जखमी माणसांना तात्काळ ॲम्बुलन्स मध्ये टाकून दवाखान्यात दाखल करण्यासाठी कोणीच पुढाकार घेत नाही. बघ्याची भूमिका घेणाऱ्या माणसांचा जमाव खूप जमलेला असतो.

परंतु त्या जखमी रुग्णांना दवाखान्यात ॲडमिट करण्याऐवजी बघ्याची भूमिका घेणारी माणसे फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात मात्र आघाडीवर असतात. कुठे अपघात झाला, कुठे बलात्कार झाला, मुलीची किंवा महिलेची छेडछाड काढली, तर एका सेकंदात अशा बातम्या सोशल मीडियावर आपल्याला पाहायला मिळतात. परंतु त्या रुग्णांना दवाखान्यात दाखल करून माणुसकीची शोभा वाढवण्याऐवजी माणुसकीला काळीमा लावण्याचे काम आजकालचा माणूस करत आहे. फसवाफसवी, अफरातफर, भ्रष्टाचार, ढोंगीपणा, अविश्वास आणि चोरी करून माणूस माणसांमध्ये माणुसकी नसल्याचे सिद्ध करून दाखवत आहे. प्रत्येक क्षेत्रात फसवा फसवी, भ्रष्टाचार, अफरातफर, अविश्वास व ढोंगीपणा वाढल्यामुळे माणूस किती खालच्या थराला गेला आहे, हे आपल्याला दिसते. प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार व फसवा फसवी वाढली आहे. भ्रष्टाचार व अफरातफर करून बरीच माणसे खूप श्रीमंत झाली आहेत. श्रीमंत जरी झाली असली तरी ती माणसे सुखी व समाधानी झाली, असे म्हणता येणार नाहीत. कारण लबाडीचा व भ्रष्टाचार केलेला पैसा कधीच माणसाला सुखी व समाधानी ठेवत नाही. अंत्यविधीला गेल्यावर किंवा दुःखद कार्यक्रमात गेल्यावर बरीच माणसे मोठमोठ्याने बोलताना व मोठ्याने हसताना आपण पाहिले असतील. कोणत्या ठिकाणी कसे वागावे? कोणत्या प्रसंगात कसे वर्तन करावे? हे आजकालच्या माणसांना कळायला मार्ग नाही. काही महाभाग मोठमोठ्याने फोनवर बोलतात आणि मोठमोठ्याने हसतात. म्हणजे अंत्यविधीला जमलेल्या माणसांमध्ये सुद्धा आपल्याला माणसे पाहायला मिळत नाहीत. म्हणून गर्दीत माणसांच्या माणसे शोधताना माणसे काही सापडत नाहीत फक्त मानव रूपातील हैवान व राक्षस मात्र आपल्याला जरूर पाहायला मिळतील...अशा मानव रुपातील हैवानांची संख्या कमी होऊन माणसांची संख्या वाढणे काळाची गरज आहे..

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

### पान १ वरुन

#### हिंद दी चादर ...

वाहतूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, कोर्टाच्या पाठीमागून हिंगोली गेट अंडरब्रिज मार्गे गोकुळनगरकडे वळविण्यात येईल. तसेच वजिराबाद चौकआय.टी.आपनवीन मोंढामहादेव दाल मिल मार्ग, महादेव दाल मिल रोड क्रमांक २६, शिवाजी महाराज पुतळारेल्वे स्टेशनहिंगोली गेट, बसवेश्वर चौक ते लातूर फाटा, लिंबगावभवानी चौकछत्रपती चौक मार्गे वाहतूक सुरू राहील.

नागरिकांनी दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतुकीस अडथळा होऊ नये यासाठी प्रशासनाने जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

#### जागतिक बौदध ...

उल्लेखनीय सहभाग राहिला आहे. समाजात समता, न्याय आणि माणुसकीची मूल्ये रुजवण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले आहे. तसेच, राजमाता जिजाऊ यांचा वैचारिक वारसा जनमानसात पोहोचवणे आणि नव्या पिढीचे प्रबोधन करणे या कार्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

**परिषदेची वैशिष्ट्ये**

या जागतिक महापरिषदेचे स्वरूप अत्यंत भव्य असणार आहे:

सहभाग: ३० देशांतील प्रतिनिधींसह महाराष्ट्रातील ज्येष्ठ भिक्खू संघ, साहित्यिक, विचारवंत आणि उद्योजक उपस्थित राहणार आहेत.

उपस्थिती: सुमारे ५ लाखांहून अधिक भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे.

नियोजन: १०,००० स्वयंसेवकांची चमू या सोहळ्यासाठी कार्यरत असणार आहे.

धम्म, मानवता आणि करुणेचा संदेश जागतिक पातळीवर पोहोचवणाऱ्या या ऐतिहासिक परिषदेशी जोडले जाणे, हे त्यांच्या प्रदीर्घ सामाजिक कार्याची पावती असल्याचे मानले जात आहे.

# संक्रांतीनिमित्त अग्रवाल महासभेतर्फे तिळगुळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम




**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय अग्रवाल महासभेतर्फे मकर संक्रांतीचे औचित्य साधून तिळगुळ, हळदी कुंकू समारंभ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन दि. २० जानेवारी रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका स्नेहलता विजयकुमार कामड यांची विशेष उपस्थिती होती.

परस्परांतील स्नेह वाढावा आणि संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात अग्रवाल समाजातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना तिळगुळ वाटप करून संक्रांतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी अखिल भारतीय अग्रवाल महासभेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सीमा पंच, प्रदेश सहकोषाध्यक्ष अनिता पित्ती, जिल्हाध्यक्ष ज्योती अग्रवाल, सचिव शीतल धानवाला, कोषाध्यक्ष सुधा अग्रवाल यांच्यासह दीपिका देवदान, रश्मी बगडिया, रीना भरतीया, वंदना गुप्ता, चंचल अग्रवाल आदी पदाधिकाऱ्यांसह समाजातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अग्रवाल महासभेच्या माध्यमातून समाज संघटन आणि संस्कृती संवर्धनाचे कार्य कौतुकास्पद आहे, असे मत नगरसेविका स्नेहलता कामड यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महासभेच्या जिल्हा व शहर कार्यकारिणीने विशेष परिश्रम घेतले.

# प्रलंबित मागण्यांसाठी समाजकार्य शिक्षकांची गांधीगिरी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यातील उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य महाविद्यालयांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) संघटनेच्या वतीने सोमवारी सहसंचालक कार्यालयावर अभिनव गांधीगिरी आंदोलन करण्यात आले. केवळ मागण्यांचे निवेदन न देता, संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन आणि कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचा सत्कार करून संघटनेने प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

काय आहेत प्रमुख मागण्या?

समाजकार्य महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे वेतन एच. टी. सेवार्थ प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने व्हावे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अर्जित रजा लाभ मिळावा, एनपीएस () व जीपीएफ () ची खाती त्वरित उघडली जावीत आणि रिक्त असलेली शिक्षक-शिक्षकेतर पदे तातडीने भरली जावीत, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले होते.

संघटनेचे अध्यक्ष प्रा. अंबादास मोहिते यांच्या सूचनेनुसार, राज्यातील सर्व विभागांत एकाच दिवशी हे आंदोलन झाले. छत्रपती संभाजीनगर येथे सहसंचालक डॉ. पंकजा वाघमारे आणि श्रीमती सांजेकर यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांना संविधानाची प्रत, गुलाब पुष्प, वृक्ष रोपटे आणि तिळगुळ देऊन नववर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सहसा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सत्कार होतो, मात्र मास्वेने कार्यालयातील शिपाई यांचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान केला, ज्याची चर्चा दिवसभर परिसरात होती.


प्रशासनाचे आश्वासन:

सहसंचालक डॉ. पंकजा वाघमारे यांनी आंदोलकांशी सकारात्मक चर्चा केली. ''कार्यालयीन स्तरावरील मागण्यांची तातडीने पूर्तता केली जाईल आणि शासन स्तरावरील प्रश्नांबाबत आजच अहवाल पाठवण्यात येईल. पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही,'' असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या आंदोलनात प्राचार्य डॉ. पी. एम. शहापूरकर, उपप्राचार्य डॉ. मधू खोब्रागडे, डॉ. सुधीर गायकवाड, डॉ. दिपक बुक्तरे, डॉ. नरसिंग पवार, प्रा. रमेश गावित, शांता शर्मा, डॉ. बालाजी मुंडे, किशोर ढेकळे, डॉ. रेणुका बडवणे, डॉ. मिना बोर्डे यांच्यासह छत्रपती संभाजीनगर विभागातील समाजकार्य महाविद्यालयांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा - प्रधान सचिव श्रीकर परदेशी

## सर्व जिल्हाधिकाऱ्यांचा घेतला आढावा



**नांदेड । प्रतिनिधी -** नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम होत आहे. जागतिक स्तरावरील हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. सर्व भाविकांची व्यवस्था चोख होईल याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे अशा सूचना मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या तयारीचा मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, शहीदी समागम राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

श्री. परदेशी यांनी छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी कार्यक्रमाच्या तयारीबाबत विचारणा केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योग्य नियोजन करावे, अशा सूचना केल्या.

जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी सांगितले की, मोदी मैदानावरील कार्यक्रम ठिकाणच्या परिसरात ५२ एकर मैदानावर भाविकांसाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्यात येत आहेत. प्रशासनाने यासाठी सूक्ष्म नियोजन केले असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था, मैदानालगत दोन टेन्ट सिटी, त्यामध्ये सुमारे १४ हजार भाविकांची निवास क्षमता, हॉटेल्स, शहरातील मंगल कार्यालये व शाळांमध्येही निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचेही ते म्हणाले.

गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग यांनीही कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. श्री. नाईक यांनी हा कार्यक्रम नऊ समाजातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन, समाज मिळून प्रयत्न करत आहे. या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा या दृष्टीने जनजागृती व्हावी. यासह शालेय स्तरापासून महाविद्यालयापर्यंत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या अधिकाधिक असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



नवीन जालना भागात ट्राफिक पोलिसांनी बुलेटवर मोठी कारवाई करण्यात आली बुलेट पकडून त्यांचे सायलेन्सर काढून कारवाई करण्यात आली. (छायाचित्र किरण खानापुरे)

## जालना जिल्हा वकील संघातर्फे ॲड वसंतराव सोळुंके यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रा गोवा आणि दिवु, दमन दादर हवेलीचे मा. अध्यक्ष ॲड वसंतराव सोळुंके यांचा जालना जिल्हा वकील संघातर्फे सत्कार करण्यात आला. ते या पूर्वी चार टर्म मध्ये निवडून आलेले आहेत. नव्याने होणाऱ्या याच संघटनेच्या पंचवार्षिक निवडणुकीत पुन्हा उभे आहेत. या प्रसंगी व्यासपीठावर ॲड. बळवंत नाईक, ॲड. सुरेश कुलकर्णी, ॲड. आनंद झा तथा ॲड. सुनील किनगावकर यांची उपस्थिती होती. आपले मनोगत व्यक्त करतांना त्यांनी वकिलासाठी केलेल्या कामाची माहिती दिली. विशेषतः करुना काळात अनेक करुना बाधित वकिलांना महाराष्ट्र बार कौन्सिल ने केलेल्या कामाचा आढावा घेतला. सध्या बार कौन्सिल चे फंड ४० कोटीच्या वर असल्याचे सांगितले. बार कौन्सिल ऑफ इंडिया या वरिष्ठ संस्थेचे नियम महाराष्ट्रात आणले. महिलांना बार कौन्सिल मध्ये उमेदवारीन आरक्षण दिले. या प्रसंगी ॲड. बळवंत नाईक ॲड. आनंद झा ॲड. सुरेश कुलकर्णी आणि सी.ए गोविंदप्रसाद मुंदडा यांनी शाल तथा बुके देऊन ॲड वसंतराव सोळुंके यांचा सत्कार केला. संचलन ॲड इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन आनंद झा यांनी केले. या प्रसंगी ॲड. लक्ष्मण उढाण, ॲड. महेश धन्नावत, आर.जे. देशमुख. ॲड. जाधव ॲड. देशमाने, ॲड. अरविंद मुरमे, ॲड. कुलकर्णी, ॲड. मुकुंद कोल्हे, ॲड. खरात, ॲड. राठोड, ॲड. राऊत ॲड.अशोक तारडे, इ. उपस्थित होते.

## लोकशाही दिनाचे २ फेब्रुवारी रोजी आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. जिल्ह्यात दि. २ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी सकाळी ठिक १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही अशा अर्जदाराचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचीत करण्यात येत आहे. कोणत्याही स्तरावर लोकशाही दिनात खालील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणर नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तसलिदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदती व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज :.. या संकेस्थळावर उपलब्ध आहे.



वसुंधरा नगर, जालना येथील महिला मंडळातर्फे मा. श्री. भास्कर आबा दानवे यांची नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल यथोचित सत्कार करण्यात आला व त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.




### जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांचा नवनिर्वाचित सदस्यांशी संवाद

# ‘जालना फर्स्ट’चा मंत्र देत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध विकासाचा निर्धार



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय व्हावा तसेच शहराच्या सर्वांगीण, नियोजनबद्ध आणि लोकाभिमुख विकासासाठी एक सामायिक दृष्टीकोन तयार व्हावा, या उद्देशाने गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली महसूल भवन येथे विशेष संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत नवनिर्वाचित सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तसेच प्रत्येक सदस्यास त्यांच्या नावाची वैयक्तिक डायरी प्रदान करण्यात आली.

**शहराच्या प्रश्नांवर थेट संवाद**

बैठकीच्या प्रारंभी सर्व नवनिर्वाचित सदस्यांनी आपला परिचय करून दिला. त्यानंतर आयुक्त आशिमा मित्तल यांच्या सूचनेनुसार सदस्यांनी शहराच्या विविध समस्या, अपेक्षा आणि उपाययोजनांबाबत खुलेपणाने मते मांडली.

**महिला सक्षमीकरण व प्रशिक्षणावर भर**

नवनिर्वाचित सदस्या संध्या देठे यांनी महापालिकेतील महिला सदस्य, विशेषतः गृहिणी पार्श्वभूमी असलेल्या सदस्यांसाठी महापालिका कायदे, कामकाज व प्रक्रिया याबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवावा, अशी मागणी केली. तसेच जन्ममृत्यू नोंदणी विभागात कर्मचारी संख्या अपुरी असल्याने नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी मनुष्यबळ वाढवण्याची गरज व्यक्त केली.

**स्वच्छता, प्लास्टिक बंदी आणि नागरी सुविधा**

अक्षय गोरंट्याल यांनी शहरातील मूलभूत सुविधा सक्षम करण्यासोबतच प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी, उघड्यावर होणाऱ्या मांसविक्रीचे नियोजन आणि जालना शहराचे स्वच्छता रँकिंग उंचावण्यासाठी सर्वांनी ‘एक परिवार’ म्हणून काम करण्याचे आवाहन केले.

**अनुभव आणि नवचैतन्याचा संगम**

दर्शना झोल यांनी जुन्या आणि नव्या सदस्यांनी एकत्र येत अनुभव व नव्या विचारांचा संगम साधून शहराच्या विकासासाठी काम करावे, असे मत व्यक्त केले. महापालिकेने नागरिकांना ‘जन्मापासून मृत्यूपर्यंत’ आवश्यक असणाऱ्या सर्व सेवा सक्षमपणे द्याव्यात, असे त्यांनी सांगितले.

**नियोजनबद्ध विकासाची दिशा**

शशिकांत घुगे यांनी पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक जाहीर करणे, शहरासाठी पाच वर्षांचा सविस्तर विकास आराखडा () तयार करणे आणि स्वच्छ प्रभागांना विशेष निधी देऊन स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याची संकल्पना मांडली.

**महसूलवाढ व पायाभूत सुविधा**

राजेश राऊत यांनी महापालिकेच्या मालकीच्या जागांवर शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारून उत्पन्न वाढवण्याचा प्रस्ताव मांडला. दुर्गेश काठोठीवाले यांनी काद्राबाद परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न उपस्थित केला, तर श्रीकांत पांगारकर यांनी भविष्यातील गरजा लक्षात घेऊन पाणी साठवण क्षमतेत वाढ करण्याची सूचना केली.

**‘जालना फर्स्ट’कडून डिजिटल पुढाकार**

बैठकीदरम्यान ‘ ’ या उपक्रमांतर्गत गोविंद काबरा यांनी नागरिकांच्या सोयीसाठी विकसित करण्यात आलेल्या विशेष मोबाईल ॲप्लिकेशनची माहिती दिली. या ॲपमुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद साधला जाणार असून, तक्रारी, सूचना व सेवा अधिक जलद मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

**आयुक्त आशिमा मित्तल यांचे सविस्तर सादरीकरण**

जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे महापालिकेचे नियम, जबाबदाऱ्या आणि आगामी महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती दिली. प्रमुख प्रकल्पः १५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प, शहरात नवीन उद्याने, मोतीबाग सुशोभीकरण व ‘सनसेट पॉईंट’, अंबड येथे नवीन फिल्टर बेड,

**आरोग्य व स्वच्छताः**

नागरी आरोग्य केंद्रांची संख्या ७ वरून २३ करण्यात आली आहे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मार्चअखेर सुरू होणार असून, नागपूर येथील एजन्सीसोबत घनकचरा व्यवस्थापनाचा करार करण्यात आला आहे. या प्रकल्पातून पालिकेला विनाखर्च महसूल मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**प्राणी सुरक्षाः**

५० क्षमतेचे डॉग शेल्टर उभारण्यात आले असून आतापर्यंत ७४५ कुत्र्यांचे निर्बीजीकरण पूर्ण झाले आहे.

**कडक शिस्त आणि ‘स्वच्छता मॉनिटरिंग’**

आयुक्त आशिमा मित्तल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आता जालना नगर परिषद नसून महानगरपालिका असल्याने कामकाजाची पद्धत अधिक शिस्तबद्ध व व्यावसायिक असावी लागेल.

**त्यांनी पुढील महत्त्वपूर्ण घोषणा केल्या** सर्व सदस्यांसाठी कायदेशीर व प्रशासकीय कामकाजाचे प्रशिक्षण. दर शुक्रवारी दुपारी ३.३० ते ४.३० या वेळेत शहरभर स्वच्छता मोहीम. सर्वाधिक स्वच्छ प्रभागाला विशेष पारितोषिक देऊन गौरव. कोणत्याही परिस्थितीत फायली घेऊन फिरू नयेत; सर्व कामे नियमानुसारच होतील. कर्मचारी व लोकप्रतिनिधींनी परस्पर सन्मान राखावा.

‘‘जालन्याकडे स्टील आणि कृषी उद्योगांचे मोठे भांडवल आहे. आपण सर्वांनी ‘जालना फर्स्ट’ या भावनेने एकत्रित प्रयत्न केल्यास जालना हे एक आदर्श शहर बनेल,’’ असा विश्वास आयुक्त आशिमा मित्तल यांनी व्यक्त केला.

## नवनिर्वाचित नगरसेवकाचा शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर यांचा यांच्याकडून सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** महानगर पालिका निवडणुकीत शिव सेनेचा १२ उमेदवार वजियी झाले आहे त्या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित नगरसेवकाचा शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर रावजी आंबेकर समाज सेवक मेघराज भैय्या चौधरी यांच्याकडून सत्कार करण्यात आला आहे शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांचा प्रभाग क्रमांक ९ मधून पराभव झाल्याने ते महापौर पदाचे दावेदार आहे पाच फुले यांना स्वीकृत सदस्य करा अशी मागणी शिवसेना कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर रावजी आंबेकर यांच्याकडे केली आहे जालना महानगरपालिकेच्या सभागृहात विविध मागण्यासाठी आक्रमक भूमिका निबोनारे विष्णू पाचफुले यांची जालना शहरात ओळख आहे स्वीकृत सदस्य करा कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे केली आहे यावेळी रितेश कांबळ बाला परदेशी बग्गु भागवत यासह शिवसेना कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते

## सन २०२५-२५ साठीचे जिल्हा क्रीडा व जिल्हा युवा पुरस्कार घोषित

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हयातील उत्कृष्ट क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा संघटक / कार्यकर्ता यांच्या कार्याचे मुल्यमापन होऊन त्यांचा यशोचित गौरव व्हावा या हेतूने सन २००२-३ या वर्षापासून जिल्हयातील उत्कृष्ट क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा संघटक/कार्यकर्ता यांना शासनाच्या वतीने देण्यात येतो.जिल्हा क्रीडा गुणवंत पूरस्कार सन २०२४-२५ चे घोषित केले असुन त्यांचे नावे पुढीलप्रमाणे आहेत. जिल्हा क्रीडा गुणवंत पुरस्कार सन २०२४-२५ तलवारबाजीसाठी जिल्हा गुणवंत क्रीडा पुरस्कार (पुरुष) रोहन लक्ष्मण वाघमारे, बुध्दीबळासाठी जिल्हा क्रीडा गुणवंत खेळाडू (दिव्यांग) पुरस्कार आदित्य आसाराम घुले, सॉफ्टबॉसाठी जिल्हा क्रीडा गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार एकनाथ बाळाजी सुराशे हे आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा धोरणानुसार जिल्ह्यातील युवकांनी पार पाडलेल्या भुमिका, दिलेले योगदान युवकांची एक अद्वितीय समुह अशी ओळख समाजात झालेली आहे. राज्यातील युवांनी केलेल्या समाजहीत च्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्ह्यातील एक युवक, एक युवती व एक संस्था यांना जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येतो.जिल्हा युवा पुरस्कार सन २०२४-२५ साठी जिल्हा युवा पुरस्कार (युवती ) करुणा अच्युत मोरे व जिल्हा युवा पुरस्कार (संस्था) स्वामी वविकानंद आश्रम किन्होळा ता. बदनापुर जि. जालना यांना देण्यात आले आला आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## चिमुकलीवर अत्त्याचार

**ठाणे** -बदलापूर पश्चिम परिसरातून एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. शाळेतून घरी परतत असताना स्कूल व्हॅनमध्ये चार वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. शाळेच्या व्हॅन चालकानेच हे कृत्य केल्याचं समोर आलं. या घटनेमुळे पुन्हा एकदा बदलापूर हादरलं आहे.

## जालना जिल्ह्यातील नोंदणीकृत फार्मासिस्टसाठी प्रशिक्षण संपन्न




**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील नोंदणीकृत फार्मासिस्टसाठी स्मार्ट फार्मासिस्ट कोर्स २.0+ प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला होता, ज्याचा उद्देश रुग्ण-केंद्रित फार्मसी प्रॅक्टिसमध्ये व्यावसायिक ज्ञान वाढवणे आणि व्यावहारिक क्षमता वाढवणे हा होता. हा कोर्स महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल - औषध माहिती केंद्राने प्रायोजित केला होता. हा कोर्स जालना येथील डिजेपी शैक्षणिक संकुलातील श्री साई जनविकास प्रतिष्ठानच्या ओजस कॉलेज ऑफ फार्मसी येथे आयोजित करण्यात आला होता. अद्ययावत वैज्ञानिक ज्ञान आणि प्रभावी रुग्ण समुपदेशनाद्वारे सामुदायिक आरोग्यसेवेमध्ये फार्मासिस्टची भूमिका मजबूत करण्यावर या कार्यक्रमाचा भर होता.

प्रशिक्षणादरम्यान, पोषण, मूत्रपिंडाशी संबंधित रोग, यकृताशी संबंधित रोग तसेच औषधी वितरण आणि रुग्ण समुपदेशनात फार्मासिस्टची भूमिका यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सर्वसमावेशक चर्चा करण्यात आली. औषध वितरित करतानाचे समुपदेशन आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्यासाठी फार्मासिस्टच्या विकसित होत असलेल्या जबाबदाऱ्यांवर सत्रांमध्ये प्रकाश टाकण्यात आला.

प्रा. पुरुषोत्तम राखुंडे यांनी पोषण या विषयावर सखोल व्याख्यान दिले. यामध्ये त्यांनी संतुलित आहाराची रचना, प्रत्येक पौष्टिक घटकाची भूमिका आणि रुग्णांच्या गरजांनुसार योग्य ओटीसी उत्पादने आणि न्यूट्रास्युटिकल्सची शिफारस करण्यात फार्मासिस्टचे महत्त्व स्पष्ट केले. हे सत्र अत्यंत माहितीपूर्ण होते आणि सहभागी फार्मासिस्टनी त्याचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी रिटेल आणि व्होलसेल असोसिएशनचे अध्यक्ष साईनाथ पवार, ओजस औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल कुचके, रिटेल आणि व्होलसेल असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनीलराव शेळके पाटील, सचिव जितेंद्र लाखोटिया, कोषाध्यक्ष दिलीप जायभाये, सहसचिव शिवाजी बजाज,संघटक सचिव सुभाष जगताप, मराठवाडा सह सचिव रामेश्वर कौटकर, जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर चव्हाण, कार्यकारी मंडळ सदस्य संतोष उखळे, सोनू वायाळ, गजानन शेळके जाफराबाद, संकेत खांडेभराड बदनापूर , रामेश्वर गिराम अंबड,अरुण आहेर,विलास पवार घनसावंगी,दत्ता गिरी परतूर , शाम काकडे ,सुनील बोडखे मंठा , अनंता पालकर,निरज मंत्री, अनिल मस्के, प्रशांत मस्के जालना औषधी परिषद समन्वयक स्वप्नील भंडारी, तसेच जिल्यातील फार्मसिस्ट यांची उपस्थिती होती. प्रशिक्षक म्हणून प्रा. पुरुषोत्तम राखुंडे, प्रा. प्रमोद भोसले आणि ऋषीकेश दिवटे यांनी काम पाहिले, या कार्यक्रमात जिल्हाभरातील नोंदणीकृत फार्मासिस्टचा सक्रिय सहभाग दिसून आला, जो सतत व्यावसायिक आरोग्य विकासात त्यांची उत्सुकता दर्शवितो. समाजाला चांगल्या आरोग्य सेवा देण्यासाठी फार्मासिस्टना सक्षम करण्यात असे उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात.

### सांगलीत २४ जानेवारीला होणार निरंकारी संत समागमाचा शुभारंभ

# एकत्वभाव, शिस्त व सेवाभावातून व्यापक तयारी पूर्णत्वाकडे

**जालना । प्रतिनिधी -** प्रेम, सेवा आणि एकत्वाच्या पावन भावनांनी ओतप्रोत असलेला महाराष्ट्रातील ५९ वा निरंकारी संत समागम येत्या २४ ते २६ जानेवारी या कालावधीत सांगली येथे परमपूज्य सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज तसेच निरंकारी राजपिता रमितजी यांच्या दिव्य सान्निध्यात श्रद्धा व भव्यतेने संपन्न होणार आहे. या तीन दिवसीय सत्संग समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, समर्पित श्रद्धाळू व निरंकारी सेवादार पूर्ण निष्ठा, शिस्त आणि निष्काम सेवाभावाने समारंभस्थळास सुसज्ज व आकर्षक स्वरूप देत आहेत.

हा दिव्य संत समागम सांगली शहरालगतच्या सांगलवाडी परिसरात सुमारे ४०० एकरांच्या विस्तीर्ण व भव्य मैदानावर आयोजित करण्यात येत आहे. या आध्यात्मिक सोहळ्यांतर्गत दररोज दुपारी २.३० वाजता मुख्य सत्संग कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. देश-विदेशातून उपस्थित राहणारे संत, वक्ते, गीतकार व कवी आपल्या विचारांद्वारे, गीतांद्वारे व रचनांद्वारे ईश्वर-परमात्मा आणि सद्गुरूंप्रती श्रद्धाभाव व्यक्त करतील. प्रत्येक दिवसाचा समारोप रात्री ९ वाजता सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराजांच्या प्रेरणादायी आशीर्वचनांनी होणार असून, ती सर्व भाविकांसाठी आध्यात्मिक मार्गदर्शनाचा आधार ठरेल. यंदाच्या महाराष्ट्र प्रादेशिक संत समागमासाठी ‘आत्म-मंथन’ ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. आत्मबोध, आत्मशुद्धी आणि मानवी मूल्यांच्या जागृतीच्या दिशेने ही संकल्पना संपूर्ण संत समागमाला गहन व अर्थपूर्ण आध्यात्मिक प्रवाह प्रदान करीत आहे.

गेल्या एक महिन्यापासून महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून आलेल्या भाविकांच्या निष्काम व निःस्वार्थ सेवेमुळे समागमस्थळ आज सुव्यवस्थित, भव्य व आकर्षक शामियान्यांनी सजलेल्या नगरीचे रूप घेत आहे. सद्गुरू माताजींच्या अमूल्य शिकवणी जीवनात आत्मसात करत, सर्व वयोगटांतील श्रद्धाळू शिस्तबद्धतेने व स्वयंप्रेरणेने सेवाकार्यात सातत्याने सहभागी होत आहेत.

या सेवांचे प्रेरणादायी व देखणे स्वरूप सर्वसामान्यांसाठी आदर्शवत ठरत आहे. भक्ती, प्रेम आणि समर्पणातून साकारलेली ही सेवा अशी आध्यात्मिक अनुभूती देणारी आहे, जी शब्दांच्या पलीकडची आहे. मानवकल्याणाच्या उद्देशाने आयोजित या दिव्य संत समागमात सहभागी होण्यासाठी जनसामान्यांना पथनाट्य, बॅनर्स तसेच सांगलीदृमिरज महानगरातील विविध भागांत आयोजित खुले सत्संगांच्या माध्यमातून आमंत्रित करण्यात येत आहे. अधिकाधिक नागरिक व श्रद्धाळूंनी या आध्यात्मिक उत्सवात सहभागी होऊन निरंकार ईश्वराच्या आश्रयाने आपले जीवन




अधिक सार्थक करावे, हा यामागचा उद्देश आहे.

या संत समागमासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी निवासी तंबू, भव्य लंगर व्यवस्था (सामूहिक भोजन), कॅन्टीन, औषधालय, सुरक्षा यंत्रणा, नियोजित वाहनतळ तसेच रेल्वे स्थानक व बस स्थानकांहून ये-जा करण्यासाठी आवश्यक वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. समागम परिसरात स्वच्छता व सुव्यवस्थेला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

निरंकारी प्रकाशन विभागामार्फत समागमस्थळी आध्यात्मिक साहित्याचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. यासोबतच संत निरंकारी मिशनचा इतिहास व मानवी सेवाकार्यांचे दर्शन घडविणारी चित्रमय निरंकारी प्रदर्शनी तसेच बालकांसाठी विशेष भव्य बाल प्रदर्शनी आयोजित करण्यात येत असून, त्यामध्ये सर्जनशील व शैक्षणिक कार्यशाळांचा समावेश असणार आहे. हे उपक्रम बालमनाच्या सर्वांगीण विकासास पूरक ठरणार आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.